RNI No. MAHBIL/2009/31733
Reg. No. MH/MR/South-322/2010-12

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार-अ

वर्ष ४, अंक ८८(२)] गुरुवार, मार्च १५, २०१२/फाल्गुन २५, शके १९३३ [पृष्ठे ४
किंमत : रुपये १४.००

## असाधारण क्रमांक ३३

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

## महसूल व वने विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ६ मार्च २०१२

## आदेश

नोंदणी अधिनियम, १९०८.

क्रमांक मुद्रांक नोंदणी. २००८/प्र.क्र.४०३/म-१.—नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) महाराष्ट्र राज्यास लागू करताना, त्याच्या कलम ७८ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि शासन आदेश महसूल व वन विभाग क्र. आरजीएन. २००८/प्र. क्र. ४०३/म-१, दिनांक १६ फेब्रुवारी २००९ आणि क्र. आरजीएन. २००९/प्र.क्र. ५६/म-१, दिनांक १ मार्च २००९ आदेश अधिक्रमित करून महाराष्ट्र शासन याद्वारे शासकीय अधिसूचना, महसूल व वन विभाग, क्रमांक आरजीएन. १५५८/६७७३१/एन, दिनांक १७ जुलै १९६१ यात प्रसिद्ध करण्यात आलेल्या फी

संबंधीच्या तक्त्यामध्ये उक्त अधिनियमाच्या कलम ७८ नुसार याद्वारे प्रसिद्ध करून दिनांक ६ मार्च २०१२ पासून पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त अधिसूचनेच्या फी संबंधीच्या तक्त्यामध्ये अनुच्छेद एक मधील,—

(क) खंड (३-अ) मध्ये "मोबदल्यासह दिलेले कुलमुख्त्यारपत्र" या मजकुरानंतर किंवा "किंवा मोबदल्याशिवाय" हा मजकूर समाविष्ट करण्यात येईल ;

(ख) खंड (४), उप खंड (अ) ऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

(१) "जर दस्तऐवजामध्ये संबंधित मालमत्तेच्या किमतीचा अथवा मूल्याच्या पूर्णतः उल्लेख करण्यात आलेला असेल अशा बाबतीत .—

| | |
|---|---|
| (अ) मूल्याची रक्कम रुपये १०,००० पेक्षा जास्त नसेल त्याबाबतीत | रुपये १०० |
| (ब) मूल्याची रक्कम रुपये १०,००० पेक्षा जास्त असेल त्याबाबतीत. | रुपये १०० अधिक १०,००० रुपयांच्या वरील रकमेच्या बाबतीत प्रत्येक १,००० अथवा त्यांच्या भागास रुपये १० प्रमाणे ३०,००० रुपयांच्या कमाल मर्यादेस अधीन राहून. |

(ग) टीप क्र. ९ नंतर पुढील नोंद समाविष्ट करण्यात येईल :—

"टीप-९ अ.— मोबदल्याशिवाय दिलेले कुलमुख्त्यारपत्र जर वडील, आई, भाऊ, बहीण, पत्नी, पती, मुलगा, मुलगी, नातू, नात किंवा आयकर अधिनियम, १९६१ (१९६१ चा ४३) मधील व्याख्येनुसार जवळच्या नातेवाईकांच्या नावाने दिले असेल तर, त्या कुलमुखत्यारपत्रास केवळ रुपये १०० इतकी नोंदणी फी आकारण्यात येईल".

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

राजेश नार्वेकर,
शासनाचे उप सचिव.

Oct 18 12 07:16p P.2

## REVENUE AND FORESTS DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 6th March 2012

*NOTIFICATION*

REGISTRATION ACT, 1908.

No. RGN. 2008/C.R. (403)/M-1.—In exercise of the powers conferred by section 78 of the Registration Act, 1908 (XVI of 1908), in its application to the State of Maharashtra and in supersession of the Government Order, Revenue and Forest Department No. RGN. 2008/C.R. (403)(1)/M-1, dated the 16th February 2009 and Government Order, Revenue and Forest Department, No. RGN. 2009/C.R. 56/M-1, dated 1st March 2009 the Government of Maharashtra hereby, with effect from the 6th March 2012 amend the Table of Fees published under the Government Notification, Revenue and Forest Department, No. RGN. 1558/67731/N, dated the 17th July 1961 and the same is hereby published as required by section 28 of the said Act, as follows namely :—

In the said notification,in the Table of Fees, in Article 1 :—

(*a*) in clause (*3A*), after the words " Power of Attorney given for consideration " the words " or without consideration " shall be inserted;

(*b*) in clause (*4*) for sub-clause (*a*), the following sub-clause shall be substituted namely :—

" (*a*) if the amount or value of the consideration or of the property to which such instruments relates is wholly expressed therein :—

| | |
|---|---|
| (a) When the amount or value does not exceed Rs. 10,000. | Rs. 100 |
| (b) When the amount or value exceeds Rs. 10,000. | Rs. 100 plus Rs. 10 for every rupees one thousand or part thereof in excess of Rs. 10,000 subject to the maximum fee of Rs. 30,000.". |

(c) after Note 9, the following Note shall be inserted, namely :—

"Note 9A.— In the case of power of attorney given without consideration to the mother, father, brother, sister, husband, wife, son, daughter, grand son, grand daughter or to near relatives as defined under the Income Tax Act, 1961 (43 of 1961), the amount of registration fee shall be Rs. 100 only."

By order and in the name of the Governor of Maharashtra,

RAJESH NARVEKAR,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT